# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## उमेदवारांना फसवणुकीपासुन सावधानतेचा इशारा (दि.03/05/17)

आयोगामार्फत विविध शासकीय पदांसाठी निवड प्रक्रिया राबविण्याचे महत्वाचे व संवेदनशील काम हाताळले जाते. आयोगाच्या परीक्षांमध्ये यशस्वी होवून शासनाच्या विविध विभागातील राजपत्रित पदांवरील नियुक्तीसाठी राज्यभरातील लाखो उमेदवार कठोर परिश्रम व अभ्यास करतात. परीक्षांर्थी उमेदवारांपैकी जास्तीत जास्त योग्य व गुणवत्तावान उमेदवार निवडण्यासाठी आयोग सातत्याने प्रयत्नशील आहे. तथापि काही वेळा काही असामाजिक घटक/व्यक्तींकडून, नोकरीची नितांत गरज असलेल्या उमेदवारांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतला जाण्याची व खोटी अमीषे दाखवून उमेदवारांची दिशाभुल केली जाण्याची शक्यता राहाते. उमेदवारांची निवड केवळ त्यांचे गुणवत्तेवर झाली असतांना/होणार असतांना ती अशा व्यक्तींमुळे झाली/होतील असे भासवून उमेदवारांना लूबाडण्याची शक्यता राहाते. याबाबत उमेदवारांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये व फसवणूकीपासुन सावध रहावे.

2. आयोगाच्या परीक्षा व एकुणच निवड प्रक्रियेच्या कामकाजात जास्तीत जास्त पारदर्शकता आणण्याचा आयोगाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आयोगाच्या प्रश्नपत्रिका काही मोजक्या व्यक्तींवर अवलंबुन न ठेवता त्यामध्ये अनेक व्यक्तींचा सहभाग घेतला जातो परंतु त्यापैकी कोंणालाच अंतिम प्रश्नपत्रिकेबाबत माहिती नसते. गोपनीयतेची पुरेपुर काळजी घेतली जाते. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांद्वारे सर्व उमेदवारांना तंतोतंत समान संधी दिली जाते. प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिकेची प्रत परीक्षेनंतर उमेदवारांकडेच राहू देणे, परीक्षेच्या दुसऱ्या/तिस-या दिवशी उत्तरतालिका संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे, त्यावर हरकती व सूचना मागविणे, आलेल्या सर्व हरकतींवर तज्ञांचे अभिप्राय घेवून अंतिम उत्तरतालिका पुन्हा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अशा पारदर्शकतेच्या अनेकविध उपाययोजनांमुळे, आपणास किती गुण मिळाले आहेत याची स्वत: उमेदवारालाच खात्रीशीर माहिती असते. त्याचबरोबर सर्व उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करुन त्याची माहिती सुरक्षित साठवून ठेवली जाते व हे काम सुरक्षित वातावरणात (Secured Environment) व मानवी हस्तक्षेपाशिवाय केले जाते. त्यामुळे लेखी परीक्षेच्या गुणांमध्ये एक गुणाचा सुद्धा फेरफार होण्याची शक्यता किंवा संधी ठेवली जात नाही. उमेदवारांना बैठक क्रमांक, मुलाखत क्रमांक व टोकन क्रमांक देतांनाही संगणकाचे सहाय्याने Randomisation केले जाते. यामुळे मानवी हस्तक्षेपास कोणताही वाव रहात नाही.

3. मुलाखत समितीतही आयोगाचे अध्यक्ष किंवा सदस्य, शासन प्रतिनिधी व विषयतज्ञ अशा तीन वेगळया विभागातील/क्षेत्रातील व जबाबदारीच्या पदांवरील वरिष्ठ अधिकारी असतात. एकपेक्षा अधिक मुलाखत समित्या असणा-या संवर्गासाठी उमेदवारांच्या गटाचे समित्यांना वाटपही, मुलाखतींपूर्वी फक्त काही मिनिटे अगोदर, चिठ्ठयांच्या आधारे केले जाते. मुलाखत दालनात जाण्यापुर्वी फक्त काही मिनिटे अगोदर उमेदवारांस टोकन क्रमांक दिला जातो/ज्ञात होतो. मुलाखत समितीतील कोणालाही उमेदवाराचे नाव, धर्म, जात अशी ओळख पटविणारी कोणतीही माहिती नसते. संगणक निर्मित टोकन क्रमांकानुसार उमेदवाराला त्याच्या मुलाखतीतील कामगिरी आधारे मुलाखतीचे गुण दिले जातात. दिवसाच्यां मुलाखती संपल्यानंतर मुलाखत समितीतील सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने त्या दिवसाच्या मुलाखतींच्या गुणपत्रिका सीलबंद करुन अन्य सुरक्षित ठिकाणी ठेवल्या जातात. अर्थातच प्रत्यक्ष निकालापर्यंत कोणालाही गुणांची माहिती मिळत नाही. अंतिम निकाल जाहीर होण्यास (न्यायालयीन-

प्रकरण, प्रशासकीय कारण किंवा अन्य कोणत्याही कारणाने) विलंब लागला तरी, आयोगातील अंतर्गत यंत्रणा किंवा कोणीही बाहेरील व्यक्ती, लेखी परीक्षेच्या किवा मुलाखतीच्या गुणात किंचितही हस्तक्षेप करु शकत नाही.

4. वरील प्रमाणे, उमेदवारांच्या निवड प्रक्रियेमध्ये त्यांच्या गुणवत्तेव्यतिरिक्त इतर कोणताही घटक परिणाम करु शकणार नाही याची आयोगाकडून पुरेपुर दक्षता घेतली जाते. असे असूनही आयोगातील कोणाही व्यक्तीच्या/कर्मचा-यांच्या नावाने किंवा अन्यथा, कोणीही व्यक्ती उमेदवाराची दिशाभुल करण्याचा किंवा प्रलोभन दाखवण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यावर किंचितही विश्वास ठेवू नये. आयोगामार्फत होणारी उमेदवारांची निवड ही गुणवत्ता आणि केवळ गुणवत्तेच्या आधारेच केली जाते या वस्तुस्थितीवर आणि स्वत:चे कठोर परिश्रम व अभ्यासावर उमेदवारांनी दृढविश्वास ठेवावा. कोणीही व्यक्ती काही आश्वासन देऊन किंवा प्रलोभन दाखवुन आर्थिक लाभ घेण्याचा प्रयत्न करत असल्यास संबंधित जिल्ह्यांच्या किंवा शेजारील जिल्ह्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करावी. विहित केलेले परीक्षा शुल्क वगळता आयोगाकडून अन्य कोणतीही रक्कम कोणत्याही कारणासाठी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्विकारली जात नाही. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे दूरध्वनी क्रमांक 022-24921212,/24922618, टोल फ्री क्रमांक 1064 व व्हॉट्सअप क्रमांक 9930997700 असे आहेत.

सचिव

दिनांक : 03/05/2017

महाराष्ट्र लोकसेवा आयोग